महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपुर.

**Govt. Medical College & Hospital,Nagpur**

संदर्भ:क्रमांक शावैमरु/आस्था-१,२/वै.अ.जाहिरात/ ८०५५ /२३ दिनांक ०८/१०/२०२३

जाहिरात

विषय :-शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर,येथील वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ची पदे, १२० दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत....

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे खालील वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ची ०५ पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे रुग्णसेवेच्या दृष्टीकोणातून तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसासाकरीता स्थानिक निवड समितीमार्फत **दि. 31/ 10/२०२३ रोजी** 3 वाजता अधिष्ठाता कार्यालय येथे पात्र उमेदवारांकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे भरण्यात येणार आहे.

दिनांक.२८/ १०/२०२३, वेळ दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. त्यांनतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर.येथिल वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे**

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकिय अधिकारी | ०५ | एमबीबीएस/ पदव्युत्तर पदवी | ७५०००/- |

वरील पदांसाठी मुलाखत **दि. 31/10/२०२३ रोजी ठिक ३ :००** वाजता अधिष्ठाता यांचे दालनात ठेवण्यात आली आहे. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता कोणताही प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. मुलाखतीस स्वतंत्र पत्र पाठविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. उपरोक्त पदे अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात भरायची असल्याने नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.

वरील जाहिरातीमधील पदांच्या संख्येत कमी/अधिक करण्याचा व तसेच निवड समिती मार्फत निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबीत ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे अथवा सदर जाहिरात रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना असतील.

**जाहिरातीत नमुद पदाचे वेतन :-** शा.नि.क्र.एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३/मंत्रालय मुंबई, दि.३१ डिसेंबर २०२० अन्वये **एकत्रित ठोक मासिक मानधन ७५०००/-** प्रमाणे देण्यात येईल.

जाहिरातीच्या शर्ती व अटी सवीस्तरपणे www.gmcnagpur.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर.

# जाहिरातीच्या शर्ती व अटी

विषय :- स्थानिक निवड समितीमार्फत (डी.एस.बी.)तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसासाठी वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्याबाबत.

१) **अर्ज मागविण्याबाबत** :- जाहीरातीमध्ये दर्शविलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच ग्रामिण आरोग्य प्रशिक्षण केंद्र सावनेर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी या जाहीरातीद्वारे आवश्यक ती अर्हता/पात्रता धारण करणाऱ्या बंधपत्रित उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

२) **अर्हता/पात्रतेबाबत** :-

iv. वैद्यकीय अधिकारी या पदासाठी शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मुंबई यांचे क्र. डीएसबी-१२०१/प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा-३,दि.२७.२.२००४मधील तरतुदीनुसार उमेदवार बंधपत्रित असला पाहीजे व त्याने संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण केलेला असला पाहिजे.

v. पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याची नोंद उमेदवाराच्या महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलच्या अथवा इंडियन मेडीकल कौन्सीलच्या नोंदणी प्रमाणपत्रावर झालेली असावी.

vi. मुलाखतीच्या दिनांकास अर्जदाराने विहीत अर्हता/पात्रता धारण केलेली असली पाहीजे.

३) **वयोमर्यादा** :- वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सर्व पदांकरिता खुल्या वर्गातील उमेदवारांसाठी उमेदवार ३५ वर्षाहुन अधिक वयाचा नसावा. मात्र मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४० वर्षापर्यत शिथीलक्षम राहील.

४) **वेतनश्रेणी** :- शा.नि.क्र.एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३/मंत्रालय मुंबई, दि.३१ डिसेंबर २०२० अन्वये **एकत्रित ठोक मासिक मानधन ७५०००/-** प्रमाणे देण्यात येईल.

५) **अंतिम दिनांक** :- अर्ज सादर करण्याचा **अंतिम दिनांक २७/१० /२०२३** पर्यंत राहील.

६) **अर्ज सादर करण्याबाबत** :-

४) विहीत नमुन्यात संपुर्णपणे व योग्य तऱ्हेने भरलेले अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतिसह वर उल्लेख केलेलया अंतिम दिनांकापुर्वी व वेळेपूर्वी वैद्यकीय अधिक्षक कार्यालयात प्रत्यक्ष सादर करणे. तसेच अपूर्ण भरलेले, प्रमाणपत्रांच्या साक्षाकिंत छायाप्रति सोबत नसलेले अर्ज स्विकारले/विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५) जे उमेदवार या अगोदरच या महाविद्यालयात / रुग्णालयात अथवा अन्यत्र शासकीय/खाजगी सेवेत असतील त्यांनी त्यांचे विहीत नमुन्यातील भरलेले अर्ज त्यांच्या विभागामार्फत /संस्थेमार्फतच तसेच संबंधित विभाग प्रमुखांच्या/संस्था प्रमुखांच्या ना हरकत प्रमाणपत्र या कार्यालयास अंतिम दिनांकापुर्वी सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवरांनी परस्पर या कार्यालयास अर्ज सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

६) ज्या उमेदवारांनी या अगोदर म्हणजे जाहिरात प्रदर्शित होण्याअगोदर साध्या कागदावर अर्ज केले असतील त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज अंतिम दिनांकापुर्वी या कार्यालयास आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित प्रतिसह सादर करावा. पुर्वीचे साध्या कागदावरील अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७) **विहीत नमुन्यातील अर्जाबरोबर सादर करावयाची कागदपत्रे** :-

**उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज योग्य तऱ्हेने व संपुर्ण भरल्यानंतर त्यासोबत पुढील कागदपत्रांच्या /प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रति खालील अनुक्रमाप्रमाणे सादर करणे बंधनकारक आहे.**

१०) प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.

११) एम.बी.बी.एस. प्रयत्नाचे प्रमाणपत्र.

१२) पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण व गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.

१३) एम.डी./एम.एस. प्रयत्नाचे प्रमाणपत्र.

१४) महाराष्ट्र मेडीकल कॉन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र.

१५) जन्म तारखेचे प्रमाणपत्र / माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र.

१६) जातीचे प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र ज्या संवर्गासाठी नॉन-किमीलेयर प्रमाणपत्र आवश्यक आहे त्या

संवर्गातल्या उमेदवारांना ते सादर करणे आवश्यक आहे.

१७) अनुभवाचे प्रमाणपत्र.

१८) बंधपत्रित उमेदवार असल्याचे प्रमाणपत्र जोडून बंधपत्रित कालावधी कधी सुरु झाला पैकी किती कालावधीपुर्ण केला याबाबतीत योग्य ते पुराव्याचे कागदपत्रे जोडणे उमेदवारास बंधनकारक आहे. त्याशिवाय त्यास नियुक्ती देता येणार नाही.

जे उमेदवार खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस.परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील व बंधपत्रित उमेदवार म्हणून दावा करीत असतील त्यांनी ते शासनाची सेवा करण्यास बंधपत्रित असल्याचा पुरावा म्हणूनी प्रवेशावेळी त्यांनी संबंधित महाविद्यालयात सादर केलेलया बंधपत्राची सांक्षाकिंत प्रत संबंधित महाविद्यालयाकडून ते शासकीय सेवा करण्यास बंधपत्रित असलयाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर आवश्यक राहील.

त्याशिवाय त्यांचा बंधपत्रित उमेदवार म्हूणन विचार केला जाणार नाही. तसेच अशा उमेदवारांनी नियुक्ती स्विकारुन मध्येच नोकरी सोडली तर त्यांना बंधपत्राच्या दंडांची रक्कम या कार्यालयास भरावा लागेल याची नोंद घ्यावी.

८) **<u>निवड प्रक्रियाबाबत</u> :-** स्थानिक निवड मंडळामार्फत उमेदवाराची त्यांच्या गुणवत्तेनुसार व आरक्षणानुसार व उपलब्ध जागेनुसार तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसाकरिता निवड केली जाईल.

९) **<u>उमेदवाराच्या निवडीबाबत प्राधान्य क्रम</u> :-**

अ) शा.नि.क्र.डीएसबी-१२०१/प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा-३, दि.२७.२.२००४ मधील तरतुदीनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारास निवडीमध्ये प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

ब) उपरोक्त निवडी नंतरही काही जागा शिल्लक राहिल्यास महाराष्ट्रातील अन्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालया तून पदवीत्तर, पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारांच्या निवडीसाठी विचार केला जाईल

क) १) "ब" प्रक्रियेनंतरही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्रातील खाजगी महाविद्यालयातून पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या **<u>बंधपत्रित</u>** उमेदवाराच्या निवडीसाठी विचार केला जाईल.

२) "ब" प्रक्रियेनंतरही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्रातील खाजगी महाविद्यालयातून पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेलया **<u>अबंधपत्रित</u>** उमेदवाराच्या निवडीसाठी विचार केला जाईल.

ड) "क" प्रकियेनंतरही काही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्रा बाहेरील उमेवाराच्या गुणवत्तेनुसार निवडीसाठी विचार केला जाईल.

१०) **<u>मुलाखतीबाबत</u> :-**

४) **दिनांक 31/ 10 /२०२३ रोजी दुपारी 3.०० वाजता** अधिष्ठाता, यांचे दालनात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच ग्रामिण आरोग्य प्रशिक्षण केंद्र सावनेर येथील वैद्यकीय अधिकारी पदासाठी पदासाठी उमेदवारांच्या मुलाखाती घेण्यात येईल. त्यासाठी कोणालाही वैयक्तिरित्या लेखी/तोंडी कळविले जाणार नाही.

५) मुलाखतीस उशिरा आल्यास/गैरहजर राहील्यास अशा उमेदवरांचा विचार केला जाणार नाही व नंतर त्याबददल कोणतेही तक्रार/निवेदन स्विकारले/विचारात घेतले जाणार नाही.

६) उमेदवारांनी स्वखर्चाने दिलेल्या वेळेत व दिनांकास मुलाखतीसाठी सर्व मुळ कागदपत्रासह/ प्रमाणपत्रासह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

११) **<u>प्रतिक्षा यादी बाबत</u> :-** वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या पदापेक्षा अर्जदाराची संख्या जास्त असेल तर अशा ठिकाणी उर्वरित उमेदवारांना प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात येईल. मात्र मुलाखतीस गैरहजर असणाऱ्या उमेदवारांचा त्यात समावेश केला जाणार नाही.

१२) **<u>इतर अटी शर्ती</u> :-**

६) शासनाचे सध्या अस्वित्वात असलेले नियम/अटी/शर्ती तसेच येथून पुढे अमंलात येणारे नियम/अटी/शर्ती निवड झालेल्या उमेदवारावर बंधनकारक असतील.

७) जे उमेदवार बंधपत्रित असतील त्यांनी बंधपत्रित सेवा पुर्ण करणे आवश्यक आहे. नियुक्ती मिळाल्यास त्यांना मध्येच नियुक्ती सोडावयाची झाल्यास बंधपत्र दंडाची रक्कम भरावी लागेल. त्याशिवाय त्यांना कोणतेही प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

८) मागासवर्गीय उमेदवरांनी आवश्यक ती जात, जातवैधता, नॉन केमिलेअर, प्रमाणपत्रे सादर करणे

आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा विचार खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजून केला जाईल याची नोंद घ्यावी.

९) उमेदवार विवाहीत असलयास त्याला २ पेक्षा अधिक अपत्य नसावीत.

१०). ज्या उमेंदवाराविरुध्द निवासी पदावर किंवा वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत असतांना शिस्तभंगाची कार्यवाही झाली असेल व त्याच्या सेवा समाप्त केल्या असतील अशा उमेदवारांच्या नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

१३) **रुजु अहवाल सादर करणेबाबत :-** निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्या कामावर रुजु झाल्याचे अहवाल द्विप्रतित या कार्यालयास सादर करावेत. अन्यथा यांचे वेतन व भत्ते काढण्यास विलंव झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१४) **जाहीरातीमधील मजकुरात बदल करण्याबाबत** :- या जाहिरातीमधील कोणताही मजकुरात नियम/अटी /शर्ती/आरक्षण/पदसंख्या इ.मध्ये केव्हाही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठातांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम अधिकारही अधिष्ठाता यांना असतील.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर.